RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Editor
Professor, Dr. Sadashiv H. Sarkate

• Mailing Address •
Professor, Dr. Sadashiv H. Sarkate
Editor : POWER OF KNOWLEDGE
Head of Dept. Marathi
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 1000/-

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

*July to Sept. 2021*

Editorial Officer

**Kranti Publication**

Georai Dist Beed

Beed -431 127

Contact : 7875827115

E-mail : Sarkatelata@gmail.com

**Published By :**

Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Vice Chancellor M.G.M.U. Aurangabad & Ex.Vice Chancellor Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication & Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr.Pratibha Aher**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Prof. Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub.Administration,
Kalikadevi College, Shirur (K.), Dist.Beed

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College, Mantha.
Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College,
Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

**Dr.Madhukar Jadhav**
Shri. Vyankatesh mahavidyalya,
Deulgaonraja, Buldana

**PEER REVIEW / REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | A Flak Study of Chetan Bhagat's 2 States: - The Story of My Marrige In Indian Ambience | Uday Madhukarrao Kharat | 1-3 |
| 2 | Chakma;a glimpse of miserable life | Abhijit Bag | 4-6 |
| 3 | Online Education in pandemic of COVID-19 | Dr. Pramodini Nawale (Kadam) | 7-11 |
| 4 | Awareness Level of Agripreneurs and Factors influencing on Agripreneurship Development in North Karnataka | Devaraju | 12-17 |
| 5 | A geographical study of the problem of population growth in India | Dr.Ghodke.J.V. | 18-22 |
| 6 | Competency-Based Education In Teaching And Learning -A Bird Eye View | Mohan V.T.<br>Dr. B.P. Shivalingappa | 23-29 |
| 7 | White Wemen Missionaries in Colonial India (1860-1920) | Moumita Datta | 30-36 |
| 8 | Role Of Digitization And E-Commerce On Indian Economic Growth | Dr. Ashwini Sunil Potphode | 37-40 |
| 9 | Resource Management And Sustainable Development | Dr. Meena Sachin Gosewade | 41-44 |
| 10 | Competency Based Education: Best Practices and Implementation Strategies for Institutions of Higher Education | Mohamad Mustafa Mujawar<br>Dr.Shivalingappa B.P | 45-48 |
| 11 | Molesworth, The Father of the Marathi -English Dictionary | Natkar Sangita Sheshrao | 49-51 |
| 12 | A Study Of Working Capital Management Of Bajaj Healthcare Ltd. | Dr. Vijay Narayan Gaikwad | 52-57 |
| 13 | दत्ता भगत यांच्या एकांकिकेतील आशयाविष्कार | प्रा.डॉ. सुशील मेश्राम | 58-63 |
| 14 | शरणकुमार लिंबाळे यांच्या कथांमधील दाहकता | डॉ.धनपाल कांबळे | 64-67 |
| 15 | 'कवयित्री उषाकिरण आत्राम यांच्या कवितेतील वेदना व विद्रोह' | श्री. ज्ञानेश्वर चंद्रभान सानप<br>डॉ. राजकुमार रघुनाथ मुसने | 68-74 |
| 16 | समर्थ रामदासांचे वाङ्मयीन कार्य | प्रा. डॉ. गौतम ढवळे | 75-76 |
| 17 | लीळाचरित्रात श्रीचक्रधरस्वामींच्या श्रीमुखी आलेली संस्कृत सूत्र | प्रा.डॉ.सौ.कविता सुनिल होले<br>प्रा.गोविंद केरवा शिंदे | 77-83 |
| 18 | रथ मधील ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रतिबिंब | प्रा.डॉ.जयराम खाडे | 84-90 |
| 19 | आदिवासी लोकगीतांमधील स्त्रीदर्शन | डॉ.राहुल भालेराव पाटील | 91-96 |
| 20 | आदिवासींचा उपेक्षित इतिहास | डॉ.कुंदा बाळासाहेब कवडे | 97-100 |
| 21 | भारतीय लोकशाही यशस्वीतेसाठी प्रबळ,खबीर आणि प्रामाणिक विरोधी पक्षाची आवश्यकता | डॉ.जयराम ढवळे | 101-106 |
| 22 | २००० नंतरच्या ग्रामीण कथांमधील वास्तव आणि जाणिवा | श्री.सोमनाथ दत्तात्रय फुगट<br>प्रा.डॉ.सुरेश व्ही. जाधव | 107-112 |

# भारतीय लोकशाही यशस्वीतेसाठी प्रबळ,खबीर आणि प्रामाणिक विरोधी पक्षाची आवश्यकता

**डॉ.जयराम ढवळे**
राज्यशास्त्र विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी, ता.गेवराई जि.बीड

**प्रस्तावना :-**

भारत स्वंतत्र झाल्यापासून गेली ६५ वर्ष आपली लोकशाही सर्वात मोठी, स्थिर व चैतन्यशील म्हणून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रसिध्द आहे. भारतीय नागरीकांनाही त्याचा रास्त अभिमान आहे. लोकशाही कोणत्या ही स्वरुपाची असली तरी राजकीय पक्षाच्या अनुउपस्थित अकालनीय आहे. त्यामुळेच लोकशाही राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्ष अपरिहार्य असतात त्यांना अनन्य साधरण महत्व असते म्हणूनच पक्षीय व्यवस्था ही लोकशाहीचा प्राण ठरते. संसदिय लोकशाहीचा जाणिवपुर्वक, विचारपुर्वक स्विकार केला आहे. कायदे करणे एवढेच संसदेचे कार्य नसून ते चर्चा करण्याचे व्यासपीठ आहे. म्हणून प्रसिध्द विचारवंत व्होल्टेअरचे "तुम्ही म्हणता ते मला मान्य नाही, ते म्हणण्याच्या तुमच्या अधिकाराचे मी अखेर पर्यंत समर्थन करेल" हे वचन संसदेच्या प्रत्येक सदस्याने लक्षात ठेवणे आवश्यक आहे. गांधीजीनीही दुसऱ्या बाजूचे म्हणणे ऐकून घेण्याची तयारी नसेल तर लोकशाहीचा विक़ास शक्य होणार नाही. विरुध्द पक्षाचे मत एकुणच घेतले नाही किवा ते ऐकून त्याची चेष्टा केली तर विचाराच्या देवानघेवाणीचा मार्गच बंद होईल एकदा असहिष्णूची सवय झाली की सत्य हातातून निसटून जाण्याचा धोका निर्माण होतो यावरुन लोकशाही यशासाठी विशेषत: संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाला अनन्य साधारण महत्व असते. इतकेच नव्हे तर विरोधी पक्षाचा भुमिकेवरच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा विकास अवलंबून असतो.

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनाही संसदीय पध्दती हीच व्यक्तिच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशिलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करु शकते. सहकार्य, शिस्त व समर्पणादी गुणाचा विकास करु शकते उच्चत्तर प्रतिचे राष्ट्रीय चारित्र्य घडवून शील, सचोटी धारीष्ठ्य इत्यादीचा पारिपोष या पध्दतीतच होऊ शकतो. आपल्याला या समाजरचनेत मानाचे स्थान आहे, आशी जाणीव हिच पध्दती प्रादुर्भूत करीत असल्यामुळे व्यक्तीच्या मुक्तीचा मार्ग ती मधून खुला होऊ शकतो. संसदीय लोकशाहीच मानवी जीवनाच्या प्रवाही स्वरुपांशी सुसगत ठरते. कारण रक्तपात न घडविता सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मुलभूत स्वरुपाचे बदल घडवून आणण्याचा मुलमंत्र फक्त तिलाच अवगत असतो. नव्हे तर विविध मुद्या संबंधीचे निर्णय मनमोकळया चर्चे अंती व सर्वाच्या संमतीने घेण्याची तरतूद फक्त संसदीय पध्दतीतच असते. या सर्वासाठी समर्थ सत्ताधारी पक्षा इतकाच प्रबळ विरोधी पक्ष संसदेत असणे अत्यावशक असतो. म्हणूनच संसदीय शासन पध्दतीत विरोधी पक्षाचे स्वागत होते एवढेच नव्हे तर उचित प्रमाणात सन्मानही केला जातो. विशेष: सत्ताधरी पक्षाला हुकूमशाही वर्तनापासून दुर ठेवण्याचे कार्य फक्त खंबीर आणि प्रामाणिक

पक्ष निर्माण झाले.

लोकमताचा आदर करत दरवेळी सत्तेचे हस्तातंरण झालेले आहे. यात शंका नाही. परंतु बऱ्याच वेळा आपल्या हातून सत्ता गेली याचे सत्तेतून बाहेर पडणाऱ्या पक्षाला इतके दु:ख होते की विरोधी पक्ष म्हणून कार्य करणे त्यांना कठीन जाते. विरोधी पक्ष किवा विरोधी आघाडी आपल्याकडे अद्याप पचनी पडलेली नाही. पक्षातील जेष्ठ नेत्याची पर्यायी मंत्री अशा प्रकारची रचना करण्यासाठी पावले उचलने आवश्यक आहे. लोकशाहीसाठी निवडणूक लढविण्याऱ्या पक्षांतच लोकशाही नाही. स्थानिक स्तरावर जनसंपर्क साधून निष्ठेने सार्वजनिक काम करण्याची प्रथच राजकीय पक्षातून नाहीशी झालेली दिसते. निवडणूकीसाठी उमेदवार म्हणून पुढे येण्यासाठी धडपड व रसीखेच (ब्रिटन मध्ये स्थानिक पक्ष उमेदवार निवडते) असते. सर्व हायकमांडच्या मर्जीवर उदमेदवार संसदेने निश्चितपणे निवडूण येतो तो त्याच्या व्यक्तिमत्वामुळे किवा त्याच्या कार्यक्षमतेमुळे अथवा त्यांच्या सारासार विचार करण्याच्या बुध्दीमुळे नव्हे तर त्यांच्या राजकीय पक्षामुळे हे मोदी लाटेच्या प्रभावामधून सिध्द होते.

भारतातील विरोधी पक्षाचे काम सोपे नाही. कारण विरोधी पक्षांनी मांडलेल्या मुद्याकडे व त्यांनी केलेल्या मागण्याकडे सरकार फारसे लक्ष देत नाही. सरकार व विरोधी पक्ष यांच्या दरम्यान क्वचितच विधायक चर्चा होते. त्यामुळे सभागृहाचे कामकाज रोखणे, घोषणाबाजी, मोर्चे सदनातील सभापतीच्या आसनासमोर धाव घेणे पक्षातील सदस्यांशी मारामारी करणे याकडेच विरोधी पक्षांचा अधिक कल दिसतो (शिवाय प्रसिध्दी माध्यमे अशा बाबीशी अधिक दखल घेतात व त्याचे रसभरित वर्णन करण्यास धन्यता मानतात हेही एक महत्वाचे कारण आहे.) संसदेच्या कामकाजात वरचेवर आणले जाणारे अडथळे व गोंधळ आणि त्यामुळे वाया जाणारा अमूल्य वेळ पाहता यातील काही कठोर उपाययोजना करावी लागेल. मुख्यत: विरोधी पक्षांना जनतेच्या तक्रारी मांडतांना आलेल्या वैफल्याने अडथळे निर्माण केले जातात. हे प्रथम मान्य करावे लागेल जागृत स्पष्टपणे बोलणारा  कृतिशिल विरोध पक्ष सरकारला धारेवर धरुन त्यांच्या अपयशा बदल, गैरवर्तन बदल किवा भ्रष्टाचार  अति गैरव्यवस्थापणाबद्दल जाब विचारु शकेल आति यशस्वी लोकशाहीचे तेच खरे गमक आहे. त्यासाठी विरोधी पक्षाला संसदेत पुरेसा वेळ मिळायला हवा. व्होल्टेअर ने म्हटले आहे. तुम्ही म्हणता ते मला मान्य नाही, ते म्हणण्याच्या तुमच्या अधिकाराचे मी अखेरपर्यंत समर्थन करेन हे वचन महत्वाचे वचन.

इंग्लडमध्ये संसदेच्या प्रत्येक अधिवेशनातील २० दिवस हे विरोधी पक्षाच्या कामकाजाला अग्रकम देण्यासाठी उपलब्ध असतात आणि त्यातील दोन दिवसाची चार भागात विभागणी करुन ते त्यांनी सुचविलेल्या कामकाजासाठी वापरले जातात या २० दिवसातीले तीन दिवस दुसऱ्या कामावरील विरोधी पक्षासाठी राखून ठेवलेले असता इतका तर्कशुध्द आखनी केल्यावर कामकाज शिस्तबध्द पध्दतीने चालते. याचे आचर्य वाटायला नको. सत्ताधारी पक्षाला सत्तेवरुन खाली खेचून ती जागा स्वत: काबिज करण्याची विजिगोषू महत्वाकांक्षा त्यांच्या ठायी सहसा नसे त्यांचा प्रयत्न स्वत:चे शासन प्रस्तापित करण्यासाठी नसून आहे त्या शासनात

त्याच्यावर बंदी घालण्यात येईल असा अध्यादेश मोदी सरकारने अद्याप काढलेला नसला तरी तो या देशात हळूहळू लागू होत आहे. अध्यादेश जारी करण्यात येतात. ही घोक्याची प्रथा आहे व त्यामुळे संसदेच्या विशेष अधिकारावर गदा येते. अत्यंत तातडीची बाब किवा आणीबाणी असल्या खेरीज अध्यादेश काढणे लोकशाही विरोधी आहे. केवळ अचानक व ताबडतोबी ने एखादी घटना घडत असल्यास त्यासाठी ही तरतुद आहे. गेल्या काही वर्षात केंद्र व राज्य सरकारांनी या तरतुदीचा गैरवापर केला. संसद बहुमतांशी रबरी शिक्षण असल्याने शासन कोणतही प्रस्ताव सहजपणे पास करुन घेतात. केंद्रसरकारने देशातील ६९ स्वंयसेवी संस्थाना विदेशी देणग्या देण्यात बंदी घातली त्यांनतर दहा बारा दिसतात आंध्र-तेलगणातील तब्बल ११४२ स्वयंसेवी संस्थावरही अशीच बंदी घालण्यास होती. १४ विदेशी देणगी देताच त्यावरही अशीच बंदी घातली. या देणगीदार संस्थाकडून येणाऱ्या पैशातून येथे विकास विरोधी कामाना बळ पुरविले जाते. संसदे हे लोकशाहीतील सर्वोच्च पीठ असल्याने देशभरासाठी महत्वाचे असणारे विषय येथे चर्चिले जावेत उचित आहे. परंतु राजकीय पक्ष या बाबत पक्षपाती भुमिका घेतात. असे दिसून येते. उदा. गोदा दंगमितील चर्चेला भारतीय जनता पक्षाचा कडवा विरोध होतो तर ज्याच्या पक्षाना नंदीग्राम मधील चर्चा नको होती. मोदिलाटेवर निवडूण आलेल्या खासदारांनी लोकसभेत प्रश्न विचारल्यानंतर उत्तर मिळाले नाही. म्हणून विशेष अधिकाराची हनहन झाल्याची तक्रार करतात. मग विरोधी पक्षाची काय असावा असेल याची कल्पणा केलेली बरी असे म्हणतात की प्रत्येंक नव्याने निवडूण आलेल्या सरकारला मधुचंद्राचा अवधी मिळत असतो. निवडणूकीत जनता जेव्हा जुण्या सकारला अव्हेरते अति नव्या सरकारला सत्तेवर आनले. तेव्हा तिच्या मनात खास काही खास अपेक्षा असतात. त्या सर्वच त्यांच्या कालावधीत पुर्त फलटूप होतील असे नाही. परंतु ज्या चुकासाठी जुण्या सरकारला हर अव्हेरले त्यांची पूनरावृत्ती न करता आकांक्षा पुऱ्या करण्याचा दृष्टीने नवे सरकार काही निश्चित धोरण व कार्यक्रम कार्यान्वित करील आणि त्या अंशतः सफल करण्यात यश मिळवेल अशी जनतेची सहाजिकच अपेक्षा असते पण नव्या सरकारने योग्य दिशेने पावले टाकली नाहीत तर जनतेच्या अपेक्षा भंग होतो व नव्या सरकारबद्दल सुरवातीला वाटणारी आपुलकी नाहीशी व्हायला लागते.शासनबाह्य सामाजिक आर्थिक क्षेत्रसुध्दा राजकीय पक्षाच्या रचनात्मक कृतिची वाट पाहत असतात.

**भारतातील स्वतंत्र विचारधार असणारे पक्ष :-**

स्वातंत्र्यापुर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संसदीय शासन व्यवस्था समोर येवून स्वतंत्र विचारधारेचा नावा प्रमाणेचा स्वतंत्र मजूर पक्ष निर्माण केला. तो खऱ्या अर्थाने विरोधी पक्षाची भुमिका वठविणारा प्रथम पक्ष ठरला. पुढे यांचे रुपातंर भारतीय रिपब्लीकन पक्षात झाले. तेव्हाही विरोधी पक्षाची भुमिका हा पक्ष पार पाडत होतो. नंतर या पक्षाला फुटीचा रोग जडला तो बरा होता होई ना. १९४८मध्ये मा.कांशीरामजी यांनी बहुजन समाज पार्टी हा पक्ष स्थापन करुन सत्ताधारी पक्षाला वटणीवर आणण्याचा प्रयत्न केला. ते यशस्वी ही झाले आणि उत्तर प्रदेशामध्ये सत्ताधारी पक्षाची भुमिकाही काही काळ बजावली आता तो विरोधी भुमिकेत दिसतो. या पक्षा बरोबर भारतीय कम्युनिष्ट आणि मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाची विचारधारा स्वंतत्र आहे.

पण त्यांचीही भूमिका संधीसांधू दिसते. अलिकडे महाराष्ट्र आणि तेलगणा देशामध्ये आपला प्रभाव पाडणारा एम.आय.एम. पक्षाची स्वतंत्र विचारधारा आहे. या सर्व पक्षांनी आणि समविचार पक्ष एकत्र आल्यास योग्य तो पर्याय निर्माण होऊन विरोधी आणि सत्ताधारी पक्षाची अदलाबदल होऊ शकते असा विश्वास वाटतो. नाहीतर कॉंग्रेसची सत्ता गेली काय किवा भाजपची सत्ता आली काय मुलगामी परिवर्तनाची अपेक्षा करणे अयोग्यच म्हणावी लागेल.

राजकारण म्हणजे निव्वळ सत्ता मिळविण्यासाठी स्पर्धा असे त्याचे स्वरुप झाले आहे. आणि एकदा सत्ता हाती आली की कशी टिकवावी याकडेच लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न सत्ताधारी पक्षाचा असतो. मतदारांनी (सामान्य) नागरीकांना दृढनिश्चय केला पाहीजे कोणत्याही प्रलोभनाला बळि न पडता कुणाच्याही दबावाखाली न येता शांतपणे विचार करुन देशाचे भले कशात आहे हे लक्षात घेऊन निष्कलंक उमेदवारालाच आपले मत द्यावे. राजकीय पक्षाची जबाबदारी ही आहे की, मतदारांची दिशाभुल न करता त्यांनी आपला कार्यक्रम जनतेपुढे ठेवावा. गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या कोणत्याही व्यक्तीस उमेदवारी न देता स्वच्छ चारित्र्याच्या लोकहितपरीयन अशा व्यक्तीस उमेदवारी द्यावी.

जोपर्यत स्वच्छ चारित्र्याचे समाजसेवी बांधीलकी असणारे व देशापुढील समस्येची जाणीव असणारे लोकहितवादी उमेदवार निवडून येत नाहीत तोपर्यत लोकशाहीतून देशाची प्रगती होत नाही. प्रशासन हे सरकारचे काम आहे. सरकारच्या समर्थकाचे काम पाठिबां देण्याचे आहे, टिका करणे हे विरोधकाचे कर्तव्य आहे. सरकारच्या धोरणाची चर्चा करणे व त्यावर प्रश्न विचारणे हे संसदेचे काम आहे. सरकार प्रशासन राबविते पण विरोधी पक्ष टीका करतात हे या तत्वामधील खरे मुद्दा आहे.जबाबदार विरोधी पक्ष म्हणून काम करण्यासाठी राजकीय परिपकवता आवश्यक आसते. संसद जर निरुपयोगी ठरली तर विरोधी पक्ष मजबूत व प्रभावी होऊ शकणार नाहीत. भ्रष्ट प्रशासन हा सत्तालोलूच व द्रव्यलोलूप राजकारणाचा परिपाक आहे. स्वच्छ व पारदर्शक प्रशासनासाठी स्वच्छ राजकारण हवे आणि त्याची आग्रहाने मागणी करणारे राजकिय पक्ष हवे असे पक्षच हेच लोंकशाहीचा प्राण ठरतें अर्थात विरोधी पक्षाचे कार्य अयोग्य कार्याला विरोध करण्यासाठी आहे राष्ट्राला विरोध करण्यासाठी नाही.

**संदर्भसूची :-**

१) भारतीय संसदीय लोंकशाहीची अग्नी परिक्षा - लेखक माधव गोडेबोलेए अनुवाद सुजाता गोडबोले.

२) तुलनात्मक शासन आणि राजकारण - लेखक डॉ.श्रीराम येरणकर.

३) भारतीय शासन आणि राजकारण - लेखक डॉ.भा.ल.भोडे.

४) भारतीय शासन आणि राजकारण - लेखक रा.ज.लोटे.

५) दै.लोकसत्ता पेपर संपादकीय लेख दि.१३/०४/२०१५.

◆◆◆



Assistant Professor
College,